# KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION

दि.24 एप्रिल 2020 रोजी कोल्हापूरातील उद्योजकांना उद्योग सुरू करण्याबाबत असलेल्या समस्याबाबत चर्चा करण्यासाठी मा.पालकमंत्री ना.श्री.सतेज पाटील, ग्रामविकास मंत्री ना.श्री. हसन मुश्रीफ, श्री. आमदार श्री.चंद्रकांत जाधव, जिल्हाधिकारी श्री.दौलत देसाई, आयुक्त श्री.कलशेट्टी तसेच औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. यावेळी उद्योग चालू करण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी आग्रही आहेत. त्यांची याबाबत सकारात्मक भूमिका आहे. त्यांनी परवाना नोंदणी, तसेच इतर कांही तांत्रिक अडचणी असतील तर त्या सोडविण्याचे आश्वासन दिले. जेणेकरून लोकांच्या हाताला रोजगार मिळेल व उद्योगांचे चक्र नियमित सुरू राहील. यावेळी झालेल्या चर्चेतील मुद्दे पुढील प्रमाणे आहेत.

1. महापालिके तर्फे कामगार व कर्मचारी यांना कारखान्यात ने आण करण्याची केएमटीची सुविधा चार्जेबल बेसिसवर देण्याचे मान्य केले आहे. यासाठी जास्तीत जास्त कामगार संख्या असलेल्या मोठया उद्योगांनी व जे लहान उद्योग आहेत त्यांनी एकत्रित कर्मचारी आणू शकतात अशा सर्वांनी केएमटीचे अधिकारी श्री.पी.एन.गुरव मो. नं. 9561329999 यांना संपर्क साधावा. मोठया उद्योगांच्या कामगारांसाठी विशेष सेवा तसेच लहान व मध्यम उद्योगांचे कामगार यांचेसाठी बस मार्गाची पूर्ण माहिती दिल्यानंतर त्यांचे चार्जेस कळविले जातील.

2. कारखान्याचे मालक आणि मुख्य कार्यकारी व्यवस्थापक असे दोन पास उद्योगांसाठी देण्यात येईल.

3. उद्योगांसाठी आवश्यक असलेले मटेरियल सप्लायर्स उदा. इलेक्ट्ीकल, औद्योगिक टूलकिट पुरवठादार इत्यादिंची परवानगी आणि माल पुरवठा करण्यासाठी एमआयडिसीव्दारे सहकार्य करण्यात येईल.

4. अंतर्गत एमआयडिसी व इतर एमआयडीसीमध्ये मटेरियल पुरवठा करण्यासाठी परवानगी देण्याचे मान्य केले आहे.

5. महानगरपालिका क्षेत्रातील उद्योग व व्यापर सुरू करण्यास अजूनही बंदी असल्याचे स्पष्ट केलेने येथील उद्योग/व्यापार सुरू होवू शकणार नाहीत.

निवेदनातील इतर मुद्दयावर चर्चा झाली आणि सदरचे मुद्दे महाराष्ट् शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत. याबाबत शासना विचार

करून निर्णय देणार आहे.

सर्व असोसिएशनच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनाची आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे.

या बैठकीस सर्व श्री.अतुल पाटील, सचिन शिरगांवकर, गोरख माळी,संजय शेटे, सतिश शेळके, धनंजय इंगळे, अमन मित्तल, काकडे, विज्ञान मंुडे, इ.उपस्थित होते.